तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्रं.०२/२०२५

श्री.सुरेश दत्तात्रय जाधव
रा.सुरपदम,स्टेट बँक कॉलनी, गल्ली नं.२
महादेवनगर,मु.पो.इस्लामपूर, ता.वाळवा,
जि.सांगली — तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटी,
ऊरण-इस्लामपूर,ता.वाळवा,जि.सांगली
२. वसंत कॉलेज ऑफ एज्युकेशन ऊरण-इस्लामपूर,
ता.वाळवा,जि.सांगली — वि.प.

वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटी, ऊरण-इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली यांचे वसंत कॉलेज ऑफ एज्युकेशन, ऊरण-इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली येथील अधिव्याख्याता श्री.सुरेश दत्तात्रय जाधव यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०७/०१/२०२५ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

तक्रारीचे स्वरूप :

१) ०१ जानेवारी २००६ पासून वेतनाची स्थान निश्चिती, प्रत्येक वर्षी होणारी वेतनवाढ व प्रत्येक वर्षी वाढणारा महागाई भत्ता याची सहाव्या वेतन आयोगानुसार होणारी फरकाची रक्कम मिळावी.

२) सहाव्या वेतन आयोगातील २०१६ पर्यंत होणारी मूळ पगारानुसार वेतन निश्चिती करून तिथून पुढे प्रत्येक वर्षाची वेतनवाढ व प्रत्येक वर्षी होणारी महागाई भत्ता वाढीनुसार आज अखेर होणारी फरकाची रक्कम मिळावी.

३) स्थान निश्चितीनुसार सहाव्या व सातव्या आयोगातील ग्रेड पे वेतनावरील फरक मिळावा.

४) कोव्हिड काळात फक्त ॲडव्हान्स दिलेले आहेत ही बाब देखील फरकामध्ये गृहीत धरावी.

संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :

१. तक्रारदार श्री.सुरेश दत्तात्रय जाधव हे दि.३१/०१/२०२५ रोजी सेवा निवृत्त झाले आहेत. अश्याप्रकारे, मालक व कर्मचारी नाते संपुष्टात आले आहे. त्यांचे संपूर्ण सेवा कालावधीमध्ये त्यांना नियमाप्रमाणे त्यांचे कामाचा देय ठरणारा पगार अदा केलेला आहे व त्यांनी तो विना तक्रार स्वीकारलेला आहे. त्यामुळे आज रोजी सेवा निवृत्ती नंतर मालक व कर्मचारी नाते संपूष्ठात आलेने, पुन्हा पूर्वीच्या अदा झालेल्या व विना तक्रार स्वीकारलेल्या पगाराबाबत व कालावधीबाबत तक्रार करणेचा अधिकारच कायद्याने त्यांना आज रोजी निर्माण होत नाही.

२. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने, अश्याच प्रकारे २२ वर्षांनी कायदेशीर हक्काची मागणी केले अपिलाची कामी "श्री. भूप सिंग विरूध्द यूनियन विरूध्द यूनियन ऑफ इंडिया" १९९२ (१) एल.एल. जे.पान नं.२६० परि ८ या न्याय निर्णयामध्ये नमूद केले आहे की,

8.	*Inordinate and unexplained delay or laches is by itself a ground to refuse relief to the petitioner, irrespective of the merit of his claim. If a person entitled to a relief chooses to remain silent for long, he thereby gives rise to a reasonable belief in the mind of others that he is not interested in claiming that relief. Others are then justified in acting on that belief. This is more so in service matters where vacancies are required to be filled promptly. A person cannot be permitted to challenge the termination of his service after a period of twenty-two years, without any cogent explanation for the inordinate delay, merely because others similarly dismissed had been reinstated as a result of their earlier petitions being allowed. Accepting the petitioner's contention would upset the entire service jurisprudence and we are unable to construe Dharampal in the manner suggested by the petitioner. Article 14 or the principle of non-discrimination is an equitable principle and, therefore, any relief claimed on that basis must itself be founded on equity and not be alien to that concept. In our opinion, grant of the relief to the petitioner, in the present case, would be inequitable instead of its refusal being discriminatory as asserted by learned counsel for the petitioner. We are further of the view that these circumstances also justify refusal of the relief claimed under Article 136 of the Constitution.*
9.	*Special Leave Petition is dismissed.*

३. तसेच, तक्रारदार यांनी त्यांची तक्रार मुदतीत येते हे दाखवणे साठी म्हणून व्यवस्थापनकडे काही अर्ज सादर केलेचे दाखल केले आहेत. प्रत्यक्षात सदर अर्जामधील नमूद विषय व तक्रार अर्जातील विषय हे पूर्णपणे वेगवेगळे आहेत.

४. तक्रारदार यांनी त्यांची तक्रार मुदतीत येते हे दाखवणेसाठी म्हणून व्यवस्थापनाकडे काही अर्ज सादर केलेचे दाखल केले आहेत. परंतू अश्याप्रकारे अर्ज सादर करून तक्रार मुदतीमध्ये येणार नाही, असे उत्तरांचल आणि इतर विरूध्द श्री शिवचरण सिंग भंडारी आणि इतर २०१३ एस.एस.सी या न्याय निर्णयामध्ये नमूद केले आहे. त्याबाबतचा मजकूर खालीलप्रमाणेः-

15	*it is clear as crystal that even if the court or tribunal directs for consideration of representations relating to a stale claim or dead grievance it does not give rise to a fresh cause of action. The dead cause of action cannot rise like a phoenix. Similarly, a mere submission of representation to the competent authority does not arrest time.*
16	*In State of Orissa v. Pyarimohan Samantaray it has been opined that making of repeated representations is not a satisfactory explanation of delay. The said principle was reiterated in State of Orissa v. Arun Kumar Patnaik*

५. तक्रारदार हे वर नमूद केले प्रमाणे सेवानिवृत्त झालेने आज रोजी शिक्षक व कर्मचारी संज्ञे मध्ये येत नाहीत. त्यामुळे त्यांनी उपस्थित केलेली तक्रार मा.तक्रार निवारण समितीचे कार्यक्षेत्रात (jurisdiction) मध्ये येत नाही.

६. तक्रारी मध्ये उपस्थित केलेले मुद्दे हे मा.दिवाणी न्यायाधीश सो यांचे कार्यक्षेत्रातील होतात. तक्रारी नुसार खालील महत्वाचे मुद्दे उपस्थित होतात.

अ) तक्रारदार यांची मागणी नुसार पगार, वेतन वाढ, भत्ते मिळणेस आवश्यक पात्रता होती किंवा नाही?

ब) तक्रारदार यांनी पुर्वी स्वीकारलेले वेतन, भत्ते व वेतन वाढी हया विना तक्रार व हक्कास बाधा न आणता स्वीकारलेने आज रोजी पुन्हा सेवा निवृत्तीनंतर त्या बाबतचा वाद उपस्थित करू शकतील का?

व मा.न्यायालय सदर मुद्दे पुराव्याचे आधारेच गुण दोषावर निकाली काढू शकतील त्यामुळे तक्रारदार यांचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र असलेने नामंजूर करण्यात यावा ही विनंती.

७. तक्रारदार श्री सुरेश दत्तात्रय जाधव यांनी कधीही कॉलेजकडे अथवा संस्थेकडे वरील संदर्भात तक्रारी अर्जामध्ये उपस्थित केलेले मुद्यांबाबत रीतसर पत्रव्यवहार करून तक्रार असल्याबाबत कळविलेले नाही. परंतू, आपले समोर तक्रार अर्जात, मात्र पान नंबर २ परि.९ मध्ये

तक्रारीच्या संदर्भात संबधित पदाधिका-यांकडे तक्रार अर्ज केला होता का?	होय
असल्यास संबधितांनी उत्तर दिले काय?	नाही

असे खोटे व चुकीचे शपथेवर प्रतिज्ञा करून नमूद केले आहे, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

८. मा.सर्वोच्च न्यायालयाने श्री किशोर समरीटे विरूध्द स्टेट ऑफ उत्तर प्रदेश २०१३ एस.सी.सी पान नं. ३९८ परि ३६ ते ३८ मध्ये नमूद केले आहे की,

36	*The party not approaching the Court with clean hands would be liable to be non-suited and such party, who has also succeeded in polluting the stream of justice by making patently false statements, cannot claim relief, especially under Article 136 of the Constitution. While approaching the court, a litigant must state correct facts and come with clean hands. Where such statement of facts is based on some information, the source of such information must also be disclosed. Totally misconceived petition amounts to abuse of the process of the court and such a litigant is not required to be dealt with lightly, as a petition containing misleading and inaccurate statement, if filed, to achieve an ulterior purpose amounts to abuse of the process of the court. A litigant is bound to make "full and true disclosure of facts". (Refer : Tilokchand H.B. Motichand & Ors. v. Munshi & Anr. [1969 (1) SCC 110]; A. Shanmugam v. Ariya Kshatriya Rajakula Vamsathu Madalaya Nandhavana Paripalanai Sangam & Anr. [(2012) 6 SCC 430]; Chandra Shashi v. Anil Kumar Verma [(1995) SCC 1 421]; Abhyudya Sanstha v. Union of India & Ors. [(2011) 6 SCC*

	145]; State of Madhya Pradesh v. Narmada Bachao Andolan & Anr. [(2011) 7 SCC 639]; Kalyaneshwari v. Union of India & Anr. [(2011) 3 SCC 287)].
37	*The person seeking equity must do equity. It is not just the clean hands, but also clean mind, clean heart and clean objective that are the equi-fundamentals of judicious litigation. The legal maxim jure naturae aequum est neminem cum alterius detrimento et injuria fieri locupletiorem, which means that it is a law of nature that one should not be enriched by the loss or injury to another, is the percept for Courts. Wide jurisdiction of the court should not become a source of abuse of the process of law by the disgruntled litigant. Careful exercise is also necessary to ensure that the litigation is genuine, not motivated by extraneous considerations and imposes an obligation upon the litigant to disclose the true facts and approach the court with clean hands.*
38	*No litigant can play 'hide and seek' with the courts or adopt 'pick and choose'. True facts ought to be disclosed as the Court knows law, but not facts. One, who does not come with candid facts and clean breast cannot hold a writ of the court with soiled hands. Suppression or concealment of material facts is impermissible to a litigant or even as a technique of advocacy. In such cases, the Court is duty bound to discharge rule nisi and such applicant is required to be dealt with for contempt of court for abusing the process of the court. {K.D. Sharma v. Steel Authority of India Ltd. & Ors. [(2008) 12 SCC 481].*

वरील निवाडयाचे आधारे मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी रंजना विश्वनाथ शहाणे विरूध्द महाराष्ट्र शासन या न्यायनिवाडयामध्ये परि. १० मध्ये नमूद केले आहे की, खोटी माहिती, वस्तूस्थिती (Facts) नमूद करून तक्रार करणारे अर्जदार हे कोणतेही रिलिफ मिळण्यास पात्र नसतात.

10	*It is thus, held by the Apex Court that any suppression of facts by a litigant, for self serving purposes needs to be deprecated and even if such a litigant may have a good*

	case on merits, should be deprived of any relief. It is in this backdrop that I am unable to accede to the prayers put forth by the petitioner.

त्यामुळे निव्वळ याच कारणासाठी तक्रारदार यांचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र असलेने नामंजूर करण्यात यावा ही विनंती.

६. तसेच तक्रारदार श्री.जाधव यांनी उपस्थित केलेले मुद्दे हे सन २००६ पासून २०१६ पर्यंतचे असल्याचे त्यांचे अर्जावरून दिसते. तसेच, त्यांना मागील तीन वर्षे तक्रार अर्ज करण्यास कोणतीही अडचण अथवा कारण नसल्याचे देखील स्पष्ट होते.

१०. तक्रारदार यांचा तक्रार अर्ज मुदतीत नसल्याचे स्पष्ट होते. महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सीटी ॲक्ट २०१६ मधील कलम ७९ नुसार ग्रीव्हंन्स कमिटीची स्थापना झालेली आहे. सदर समिती मध्ये सेवानिवृत्त न्यायाधिश व डीन यांचे नेमणूकीची मुदत ही तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठी नाही.

त्याचप्रमाणे, कोणत्याही तक्रारदारास कधीही, कुठल्याही कारणासाठी, केंव्हाही सदर कमिटीकडे अर्ज करता येत नाही. सदर कायद्यामध्ये ग्रीव्हन्स कमिटीकडे तक्रार अर्ज करण्यासाठी, कारण घडले पासून तक्रार अर्ज करणेसाठी मुदत कालावधी नमूद नाही. अशापरिस्थतीत लिमिटेशन ॲक्ट मधील रेसिज्यूरी आर्टिकल ११३ नुसार तीन वर्षाची मुदत येते याची नोंद घ्यावी. त्यामुळे तक्रारदाराचा तक्रार अर्ज मुदतीत नसल्याने नामंजूर होण्यास पात्र असलेने नामंजूर करावा ही विनंती.

११. श्री.सुरेश दत्तात्रय जाधव यांचेकडून आजतागायत महाविद्यालय व संस्थेकडे कोणत्याही तक्रारीचा अर्ज प्राप्त झालेला नाही. तक्रारदाराने रीतसर कॉलेजकडे अथवा संस्थेकडे त्यांचे वेतनाबाबत सेवावेतन निश्चिती बाबतचे शंकाबाबत रीतसर अर्ज केलेस त्याचे निराकारण केले जाईल याची नोंद घ्यावी. तक्रारदारास देय ठरणारे वेतन वेळोवेळी अदा केलेले आहे. त्यांचे देय ठरणारे कोणतेही वेतन थकीत नाही.

१२. श्री. सुरेश दत्तात्रय जाधव यांचेकडून करणेत आलेल्या तक्रारी साफ खोटया व चुकीच्या मजकुराच्या आणि महाविद्यालयास बदनाम करण्याच्या हेतूच्या आहेत.

१३. महाविद्यालयातील शैक्षणिक कामकाज व वातावरण अतिउत्कृष्ट असून ते प्रगतीपथावर सातत्याने टिकून राहणेसाठी सदर कर्मचा-याबाबत महाविद्यालयाने कायम मानवतावादी व सहानुभूतीपूर्वक भूमिका घेतलेली आहे. तरीदेखील तक्रारदार आपणाकडे खोटया मजकुराची तक्रार देवून महाविद्यालय प्रशासनास बदनाम करणे व महाविद्यालयीन कामकाजातील वातावरण बिघडणेचे कृत्य करीत आहेत. यामुळे महाविद्यालयातील इतर कर्मचा-यांवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

१४. तक्रारदाराने खोटी व चुकीची माहिती नमूद करून अर्ज केला असल्याने व जर तक्रारदाराने कॉलेजकडे अथवा संस्थेकडे रीतसर अर्ज केल्यास त्याचे सर्व शंकांचे निरसन होणार असलेने, तक्रारदाराचा सदर अर्ज नामंजूर केलेने तक्रारदाराचे कोणतेही नुकसान होणार नसल्याने, तक्रारदाराचा सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा ही नम्र विनंती.

समितीची निरिक्षणे :

प्रस्तुत प्रकरणात समितीने उभय पक्षकारांचे लेखी म्हणणे तसेच युक्तिवाद ऐकून घेतला. तक्रारदार यांची नियुक्ती तसेच ते सेवेत कायम झालेचा दिनांक या दोन्ही बाबी उभय पक्षकारांना मान्य आहेत. तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये दि.०१ जानेवारी २००६ पासून वेतनाची स्थान निश्चिती, प्रत्येक वर्षी होणारी वेतनवाढ व प्रत्येक वर्षी वाढणारा महागाई भत्ता याची सहाव्या वेतन आयोगानुसार होणारी फरकाची रक्कम मिळावी, सहाव्या वेतन आयोगातील २०१६ पर्यंत होणारी मूळ पगारानुसार वेतन निश्चिती करून तिथून पुढे प्रत्येक वर्षाची वेतनवाढ व प्रत्येक वर्षी होणारी महागाई भत्ता वाढीनुसार आज अखेर होणारी फरकाची रक्कम मिळावी, स्थाननिश्चितीनुसार सहाव्या व सातव्या आयोगातील ग्रेड पे वेतनावरील फरक मिळावा, कोव्हिड काळात फक्त ॲडव्हान्स दिलेले आहेत, ही बाब देखील फरकामध्ये गृहीत धरावी इत्यादी तक्रारी नमूद केलेल्या आहेत. तक्रारदारांनी त्यांचे तक्रारीसोबत नियुक्ती आदेश जोडले आहेत. शिवाजी विद्यापीठाकडून दिलेल्या मान्यता जोडल्या आहेत. मान्यतेमध्ये

जा.क्र. आयटी-५/३२६३, दि. ०६/०७/१९९४ अन्वये घातलेली नेटसेट परीक्षा पास होण्याची अट विद्यापीठाने रद्द केल्याचे दिसून येते. दि.३०/०८/२००४ रोजी सेवेत कायम केलेबाबत तक्रारदार यांना संस्थेने दिलेले पत्र दिसून येते.

तक्रारदार यांनी जोडलेल्या या पुरावा कागदपत्रांबाबत व त्यांच्या नियुक्तीबाबत जाबदार संस्था व महाविद्यालयाने हरकत अथवा कोणतेही कागदपत्र स्पष्ट नाकारलेले नाहीत. परंतु, तक्रारदार यांच्या सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार फरकाची रक्कम मिळणेबाबतची तक्रार संस्था, महाविद्यालयास मान्य नाही. तक्रारदार दि. ३१/०१/२०२५ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत तक्रारदार यांना रितसर पेन्शन सुरू झाली आहे. सेवानिवृत्तीमुळे मालक व कर्मचारी नाते संपुष्टात आले आहे. सबब खोट्या व चूकीच्या मजकूराचा अर्ज तक्रारदार यांनी कलुषित हेतूने दाखल केले असलेने तक्रारदार यांची तक्रार नामंजूर करण्यात यावी तसेच तक्रारदार व जाबदार यांच्या मालक-कर्मचारी नाते संपुष्टात आलेबाबत हरकत घेवून तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार अर्ज त्यांच्या सेवाकालावधीत केलेला नसल्याचे जाबदार यांनी कथन केले आहे. तसेच जाबदार यांनी समितीकडे दाखल केलेल्या दि.१९/०९/२०२५ रोजीच्या पत्राव्दारे मा.मुंबई उच्च न्यायालय याचिका क्रं.९२८६/२०२२ (रविकांत महादेव चौगुले विरूध्द महाराष्ट्र शासन) या निर्णयाचा आधार घेत तक्रारदार याने तक्रार वेळेत केली नसलेने व तक्रारदार सेवेमधून सेवानिवृत्त झाले असलेचे म्हणणे मांडले आहे. या निर्णयानुसार वित्तीय देर्णीबाबत विलंबाने दाद मागितली असल्यास तसेच दुस-या शिक्षकास लाभ मिळाले म्हणून सेवाकालावधीमध्ये मागणी न करता नंतर सेवानिवृत्तीनंतर न्यायालयात दाद मागत असलेस त्याला त्याचा फायदा/लाभ मिळणार नाही. या समितीने सदरचा निर्णय सुक्ष्म अभ्यासला असता, प्रस्तुत प्रकरणात संस्था/महाविद्यालयास या निर्णयाचा लाभ मिळणार नाही. कारण समितीच्या मते प्रस्तुत प्रकरणातील तक्रारदार शिक्षक यांनी सेवेमध्ये असताना तक्रार दाखल केली आहे. मा.उच्च न्यायालयासमोरील निर्णयामधील शिक्षक यांनी सेवानिवृत्तीनंतर त्या न्यायालयासमोर तक्रार दाखल केली होती व उच्च न्यायालयाने सर्व बाबी रिट अधिकार क्षेत्रात निर्णयीत केल्या आहेत. सबब, संस्थेने सादर केलेल्या निर्णयामधील वस्तूस्थिती प्रस्तुत प्रकरणाशी साम्य नाहीत.

तक्रारदार यांनी जाबदार यांच्या म्हणण्यास विरोध दर्शवून त्यांच्या म्हणण्याच्या पृष्ठयार्थ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १०८ (एफ) व १०८ (एच) मधील तरतूदी नमूद केल्या आहेत. त्यानुसार प्रस्तावित महाविद्यालयाला संलग्नीकरण देण्याच्या संदर्भात विद्यापीठाने विहित केलेल्या सर्व अटींचे महाविद्यालयाने पालन करावे अशी तरतूद असल्याचे दिसते. सदर तरतूद महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मध्येही नमूद असल्याचे कथन केले आहे. तक्रारदार यांना सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार वेतन व वेतननिश्चिती होणेबाबत कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ यांनी दिनांक ०८/०३/२०११ व दिनांक ०२/०४/२०१९ रोजीचे आदेश पारित केले आहेत. तसेच सहाव्या व सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीत व वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार सर्व भत्त्यांसह वेतन अदा करणेकरीता मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद बेंच यांचेकडील याचिका क्र.११०९१/२०१०, भारतीय कामगार सेना वगैरे विरूध्द विद्यापीठ अनुदान आयोग वगैरे तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाकडील सिव्हिल अपील क्र.११५-११६/२०१७ महात्मा गांधी मिशन व इतर विरूध्द भारतीय कामगार सेना व इतर व अन्य प्रकरणांचे निवाडे त्यांनी जोडले आहेत. तसेच जाबदार यांच्या मुदतीच्या कायद्यातील रेसिज्युरी आर्टीकल ११३ ची तरतूद तक्रारीस लागू होत नसल्याबाबत कथन केले आहे. त्यास त्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाचा एम.आर. गुप्ता विरूध्द भारत सरकार, अखिल महाराष्ट्र कामगार युनियन विरूध्द वॉर्डन ॲण्ड कंपनी या प्रकरणातील निवाडे जोडले आहेत.

उपरोक्त सर्व बाबी समितीने अभ्यासपूर्वक अवलोकनी घेतल्या असता, समितीचे असे मत आहे की, तक्रारदार यांनी तक्रार दि.०७/०१/२०२५ रोजी तक्रार अर्ज तक्रार निवारण कक्षाकडे दाखल केलेला आहे. तक्रार दाखल करतेवेळी तक्रारदार सेवेत असलेने तक्रारदार व जाबदार यांचेमधील मालक-कर्मचारी हे नाते अस्तित्वात होते. त्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम ७९ नुसार तक्रारदार यांची तक्रार या समितीसमोर चालणेस पात्र आहे असे ही समिती मत नोंदवित आहे.

तक्रारदार यांच्या दि.०१/०१/२००६ पासून वेतनाची स्थाननिश्चिती, प्रत्येक वर्षी होणारी वेतनवाढ व वाढणारा महागाई भत्ता याची सहाव्या वेतन आयोगानुसार होणारी फरकाची रक्कम

मिळणेबाबत विनंती नमूद आहे. तक्रारदार यांच्या सेवेबाबत किंवा त्यांना देय असलेले वेतन, स्थाननिश्चिती, त्यांना दिलेल्या वेतनवाढी व अनुषंगिक फायदे दिले आहेत किंवा कसे याबाबत तक्रारदार अथवा जाबदार संस्था, महाविद्यालयाने या समितीसमोर सेवापुस्तकाची प्रत हजर केली आहे. या सेवा पुस्तकामधील नोंदी विचारात घेता सेवापुस्तकावर काही ठिकाणी प्राचार्यांच्या सहया नाहीत. ६ वा वेतन आयोग २०१८ मध्ये लागू करण्यात आला आहे. तसेच वेतनवाढ दिल्याचे नोंदी दिसून येत नाही. सेवापुस्तकावर तक्रारदार यांच्या सहया देखील घेतलेल्या नसलेचे दिसून येते.

सबब, या समितीचे असे मत आहे की, नियुक्ती आदेशामध्ये नमूद केलेनुसार तक्रारदार यांना लागू असलेले वेतन, सहावा वेतन लागू केलेल्या दिनांकापासूनचे वेतन त्यानुसार होणारी वेतनवाढ व अनुषंगिक भत्ते देणे ही जाबदार संस्था, महाविद्यालयाची जबाबदारी आहे. महाविद्यालयातील शिक्षकांकरीता लागू असलेल्या नियमानुसार सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार तक्रारदार यांची वेतननिश्चिती करून त्यानुसार वेतनफरक देणे ही जबाबदारी संस्था, महाविद्यालयाची आहे.

तसेच तक्रारदार यांनी नमूद केलेल्या स्थाननिश्चितीबाबत सेवेत असताना तत्कालीन परिस्थितीमध्ये ते पात्र होत असताना त्यांचे प्रस्ताव पाठविण्याबाबत व स्थाननिश्चिती होण्याबाबत त्यांनी युजीसी व शासन नियमानुसार सेवाकालावधीतच कार्यवाही करणे आवश्यक होते.

तक्रारदार यांनी तक्रार अर्जात कोव्हीड काळामध्ये फक्त ॲडव्हान्स दिला आहे, त्याचा फरक देणेबाबतही तक्रार नमूद केली आहे. परंतू तक्रारदार यांनी या तक्रारीच्या पृष्ठार्थ कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच तक्रारदार यांनी त्यांच्या सर्व फरकांच्या मागणीबाबत तौलानिक तक्ता अथवा त्याच्या पृष्ठयार्थ तपशील जोडलेला नाही. जाबदार यांनीही याबाबत त्यांच्या म्हणण्याच्या पृष्ठयार्थ कागदपत्रे सादर केलेली नाहीत. सबब, समिती या निष्कर्षास येते की, कोव्हीड कालावधीमध्ये जाबदार यांनी तक्रारदार यांना वेतनापोटी जी काही ॲडव्हान्स रक्कम दिली आहे, ती वजा करून वेतनाची उर्वरीत फरक रक्कम संस्था महाविद्यालय यांनी तक्रारदार यांना देणे आवश्यक आहे. सबब, समिती खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

सदरची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

१. जाबदार संस्था व महाविद्यालय यांनी, तक्रारदारांची वेतननिश्चिती, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार, त्या शिफारशी लागू होण्याच्या तारखांपासून, तक्रारदार निवृत्त होण्याचे तारखेपर्यंत करून, त्यानुसार देय होणारे वेतन व भत्ते आणि प्रत्यक्षांत त्यांना दिलेले वेतन आणि भत्ते यातील फरक हा आदेश प्राप्त झालेल्या तारखेपासून २ महिन्यांत तक्रारदार यांना द्यावे.

२. कोरोना काळात दिलेले ॲडव्हान्स वेतन, वरिल नमुद आदेशानुसार देय रक्कमेतून वजा करून, फरकाची रक्कम हा आदेश प्राप्त झालेल्या तारखेपासून २ महिन्यांत तक्रारदार यांना द्यावे.

३. तक्रारदाराची स्थाननिश्चितीची मागणी, ते निवृत्त झाले असलेने नाकारण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 07 MAY 2026

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.ए.बी.साळी)

अध्यक्ष
(श्री.एस.एन.पाटील)